महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

जिल्हा रुग्णालय,नाशिक

अनंत कान्हेरे मैदान समोर, त्रंबकरोड नाशिक-४२२००२

दुरध्वनी क्रमांक:- २५७२०३८

Email ID: cs_nashik@rediffmail.com

# जाहीर नोटीस ( दरपत्रके आमत्रंण पत्र )

सुचित करण्यात येते की,जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक कार्यालया मार्फत सिंहस्थ कुंभमेळा २०२७-२८ च्या अनुषंगाने श्री क्षेत्र त्रंबकेश्वर येथे मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १०/११/२०२५ रोजी पार पडलेल्या महाराष्ट्रातील पाच ज्योतीलिंग विकास आराखडयाचे आढावा बैठकीत उपजिल्हा रुग्णालय,त्रंबकेश्वर जि.नाशीक तात्पुरती व्यवस्था करुन इतर पर्यायी जागेत स्थलांतरीत करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.इत्यादी बाबत दर मागविण्याचे निश्चित केले आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा व खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत प्रशासकीय कार्यालय, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी तसेच मोहरबंद तांत्रिक व व्यापारील लिफाफा स्वतंत्र सादर करण्यात यावा.

दरपत्रके सादर करण्याऱ्यां पुरवठाधारकांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती -

०१) एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे.कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकरण्यात येतील.उदा.जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी / प्रकल्पासाठी / निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती कंपनी एक्स चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती कंपनी वाय ची मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक नसावी

०२)निर्माणकर्त्याचा अधिकृत विक्रेता, ठोक व्यपारी यांना दरपत्रक सादर करता येतील दरपत्रकात पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबी बददलची सविस्तर माहिती जसे मौटेल, मेक इत्यादी नमुद करणे आवश्यक आहे यादीत विर्निदिष्ट पुरवठा करणे बाबतचा पुर्वानुभव दाखला जोडण्यात यावा.

०३)आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्र. (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड ची छायांकीत प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

०४)संस्था/दुकान,साहीत्यं/पुरवठा/विक्री विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडावा.

०५)दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता / ठिकाण - प्रशासकीय कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक जिल्हा रुग्णालय, नाशिक आवार, त्रंबकेश्वर रोड, नाशिक. पिन कोड ४२२००१.

०५)विहीतं कालावधीत स्थलांतर न झाल्यास शासकीय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

०७)विहीत नमुन्यातील वस्तुचा सेवा कर(GST Number) सहित देयके स्विकारण्यात येतील, दर हे सर्व करांसहित व उचल ठेव इमाली पोहच खर्चासहीत असावे.

०८)मंजुर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकांकडुन वसुल केली जाईल.

Scanned with OKEN Scanner

०९)स्थानीक पुरवठा दारांना प्राधान्य राहील तसेच इच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय
प्रक्रियेसाठी काळ्या यादीत टाकलेले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र न्यायिकेतर मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर
बंधनकारक आहे.

१०)दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासुन आठ दिवस संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल
सुट्टी वगळुन)उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

११)दरपत्रके उघडण्याची तारीख या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

१२)दरपत्रकासोबत सादर करण्यात येणारे दस्तावेज(कागदपत्रे) राजपत्रित अधिकरी किंवा शासनाने प्राधिकृत के
अधिकाऱ्याकडुन साक्षांकित करुन सादर करावे.

१३)कोणतेही लेखी तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा काही भाग
खरेदी प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे व खरेदीचे सर्व अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी राखुन ठेव
आहेत. मान्य न्युनतम दर हे दर स्विकृत केल्या पासुन एक वर्षासाठी वैध राहतील.

१४) शासन, शासकीय रुग्णालय किंवा तत्सम संस्थेचे शिफ्टिंगचे काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.

१५) रुग्णालयातील सर्व साहित्य, फर्निचर, वैद्यकीय उपकरणे, कार्यालयीन अभिलेख व इतर साहित्य सुरक्षितपणे
पॅकिंग, लोडिंग, वाहतूक, अनलोडिंग व निश्चित ठिकाणी मांडणी करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१६) शिफ्टिंगदरम्यान कोणत्याही साहित्याचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई कंत्राटदाराने करावी.

१७) आवश्यक मनुष्यबळ, वाहने, पॅकिंग साहित्य व इतर साधनसामग्री कंत्राटदाराने स्वतःच्या खर्चाने उपलब्ध करून
द्यावी.

१८) काम रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

१९) काम सुरू करण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून पंचनामा/तपासणी करण्यात येईल.

२०) कामाच्या दरम्यान सुरक्षा नियमांचे व सर्व शासकीय नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२१) कोणत्याही अपघातास किंवा मनुष्यहानीस कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील.

२२) देयक काम पूर्ण होऊन समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच अदा करण्यात येईल.

२३) निविदा स्वीकारण्याचा किंवा कोणतीही निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

२४) कोणताही वाद उद्भवल्यास संबंधित जिल्ह्याच्या न्यायालयाचे अधिकारक्षेत्र लागू राहील.

२५) निविदादाराने आवश्यक सर्व कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक राहील.

२६). निविदादाराकडे वैध GST नोंदणी, PAN, व्यवसाय नोंदणी व इतर आवश्यक परवाने असणे आवश्यक आहे.

२७) निविदादाराने प्रत्यक्ष स्थळ पाहणी (Site Visit) करूनच दरपत्रक सादर करावे.

२८) शिफ्टिंगदरम्यान रुग्णालयाच्या कामकाजात कमीत कमी अडथळा निर्माण होईल याची दक्षता घेणे बंधनकारक
राहील.

(डॉ. सतिषकुमार वसंत शिंपी )
जिल्हा शल्य चिकित्सक,नाशिक.

Scanned with OKEN Scanner

# व्यापारी लिफाफा

दुरुस्तीसाठी आवश्यक वस्तुचा पुरवठा करणेबाबत यादी

| अ.क. | वस्तुचे नाव | वस्तुचे मार्क (कंपनी) | एकूण दर | जीएटी | फायनल दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपजिल्हा रुग्णालय,त्र्यंबकेश्वर जि.नाशीक हे रुग्णालय स्थलांतरीत करण्याकरिता दर | | | | |

१)दरपत्रके सिलबंद करुन प्रशासकिय कार्यालय, जिल्हा रुग्णालय,नाशिक येथे पाठविण्यात यावे.

२)वरिल यादीतील साहित्य/वस्तु हया आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येईल.

३) दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचे अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय, नाशिक यांनी राखुन ठेवले आहे.

सही

पुरवठा धारकांचे नांव

पुरवठा संस्थेचे नांव

पत्ता

Scanned with OKEN Scanner

To be submitted on Original letter head/pad

Annexure-4

निविदाकाराचे हमी पत्र

महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४ दिनांक ०१ डिसेंबर २०१६, नियम ४.२.५ नुसार मी/ आम्ही.............................................. या हमीपत्राद्वारे लिहून देतो की, दरपत्रक मागविण्या-या खरेदी प्राधिका-यासोबत कोणत्याही प्रकारे हितसंबंध नसून हितसंबंधाबाबत संघर्ष नाही तसेच खरेदी प्राधिका-याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असून दुस-या कोणत्याही संस्थेशी संयुक्तिक किंवा संगनमताने साखळी करून दरपत्रक भरलेले नाही असे आढळून आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

दिनांक

ठिकाण

दरपत्रक सादर कर्त्याची स्वाक्षरी व शिक्का

Scanned with OKEN Scanner